# पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम

काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दूरध्वनी क्र. – ०७२५२-२३४८२४
ई-मेल :- sp.washim@mahapolice.gov.in
वेबसाईट :- www.washimpolice.gov.in


---

**• प्रेस नोट •** दि.२४.०९.२०२२

## महिनाभरात ३०९४ जणांना चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र वाटप ; जिल्हा विशेष शाखेची 'विशेष' कामगिरी.

***

केंद्र शासनाने भारतीय सैन्याच्या भरती प्रक्रियेत अभिनव उपक्रम राबवत 'अग्निवीर' भरती सुरु केली आहे. त्यामध्ये कोणत्याही सरकारी अथवा खाजगी नोकरीकरिता पोलीस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची आवश्यकता असते. ऑनलाईन अर्ज केल्यानंतर प्रथम पोलीस स्टेशन स्तरावर व नंतर पोलीस अधीक्षक कार्यालय स्तरावर उमेदवाराची चारित्र्य पडताळणी केली जाते. त्यामध्ये उमेदवारावर काही गुन्हे दाखल आहेत का? किंवा मा.न्यायालयात सदर उमेदवाराविरुद्ध काही खटले प्रलंबित आहेत कि कसे? याची पडताळणी करून नंतरच सदर उमेदवारास चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र दिले जाते.

नुकतीच केंद्र शासनाने जाहीर केलेल्या अग्निवीर भरतीच्या मैदानी चाचणीस सुरुवात झाल्यामुळे उमदेवारांची चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी धावपळ सुरु आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम येथील जिल्हा विशेष शाखा येथे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र वाटपासाठी मा.पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी जिल्हा विशेष शाखा येथील कमर्चारी दिवसरात्र मेहनत घेत आहेत. जिल्ह्यातील १३ पोलीस स्टेशन स्तरावरून चारित्र्य पडताळणी पूर्ण झाल्यानंतर पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम येथून पडताळणी होऊन सदरचे प्रमाणपत्र उमेदवारांना अदा केले जात आहे. माहे सप्टेंबर – २०२२ मध्ये आजपावेतो पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम येथील जिल्हा विशेष शाखेमध्ये एकूण ३०९४ अर्ज चारित्र्य पडताळणीसाठी प्राप्त असून त्यापैकी सर्व ३०९४ अर्जांचा निपटारा करून सदर अर्ज संबंधित उमेदवारास वाटप करणे सुरु आहे.

सदर कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.प्रवीण धुमाळ, जिल्हा विशेष शाखा, वाशीम, पोउपनि.राहुल चौधरी, मपोशि.१३०१ शीतल मानकर, मपोशि.९८० सोनाली सोळंके, मपोशि.१३४८ निर्मला गायकवाड हे पार पाडत आहेत.

**(जनसंपर्क अधिकारी)**
पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.